## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५१/२०२१ मधील निशाणी १० वरील आदेश

१. अर्जदार क्र.१ यांनी स्वतःकरीता व अर्जदार क्र.२ ची अ.पा.क. म्हणून हा अर्ज त्यांचे नावे मंजूर झालेली दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) अशी एकूण दरमहा रक्कम रु.२०,०००/- (रुपये वीस हजार मात्र) गैरअर्जदार यांचे वेतनातून कपात होवून अर्जदार यांना देणेबाबत गट शिक्षणाधिकारी, धडगाव, ता.धडगाव, जि.नंदुरबार यांना आदेशित व्हावे, यासाठी दाखल केला आहे.

२. गैरअर्जदार यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करून त्यांच्या खात्यातून पैसे कमी करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही, असे कथन केले आहे.

३. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

४. अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री.टी.ए.शेख यांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदार यांचे अर्जाबाबत म्हणणे ऐकले.

५. अर्जदार क्र.१ व २ यांनी या अर्जाद्वारे त्यांना मंजूर झालेली दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) अशी एकूण दरमहा रक्कम रु.२०,०००/- (रुपये वीस हजार मात्र) गैरअर्जदार यांचे वेतनातून कपात होवून त्यांना देणेबाबत गट शिक्षणाधिकारी, धडगाव, ता.धडगाव, जि.नंदुरबार यांना आदेश व्हावेत, अशी विनंती केली आहे. गैरअर्जदार यांनी त्यास हरकत नाही, असे म्हणणे सादर केले आहे. गैरअर्जदार यांना त्यांचे वेतनातून पोटगीची रक्कम कपात करणेबाबत प्रत्यक्ष विचारणा केली असता त्यांनी कथन केली की, त्यांना या कामी प्रत्येक तारखेस हजर राहणे शक्य नाही. त्यामुळे, त्यांचे वेतनातून पोटगीची रक्कम वसूल करण्यास त्यांची हरकत नाही. अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये केलेली मागणी व गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये व न्यायालयासमोर केलेले कथन पाहता अर्जदार क्र.१ व २ यांना फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७९/२०१७ चे कामी मंजूर झालेली प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) अशी एकूण

दरमहा रक्कम रु.२०,०००/– (रुपये वीस हजार मात्र) गैरअर्जदार यांचे वेतनातून कपात करणे व ती रक्कम न्यायालयात जमा करून घेवून अर्जदार यांना अदा करणे योग्य व उचित होईल. सबब, मी खालील आदेश करीत आहे :–

**आ दे श**

**१.** अर्जदार यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७९/२०१७ चे कामी दिनांक ३१.०८.२०१८ रोजीच्या आदेशाने अर्जदार क्र.१ व २ यांना मंजूर झालेली दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– (रुपये दहा हजार मात्र) अशी एकूण दरमहा रक्कम रु.२०,०००/– (रुपये वीस हजार मात्र) गैरअर्जदार यांचे वेतनातून कपात करून अर्जदार यांना देणेसाठी न्यायालयात जमा करणेबाबत गट शिक्षणाधिकारी, धडगाव, ता.धडगाव, जि.नंदुरबार यांना आदेशित करणेत येत आहे.

**३.** गट शिक्षणाधिकारी, धडगाव, ता.धडगाव, जि.नंदुरबार यांना आदेशाची समज देण्यात यावी.

**४.** गट शिक्षणाधिकारी, धडगाव, ता.धडगाव, जि.नंदुरबार यांनी त्यांना या आदेशाची समज मिळालेनंतर आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करावी.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.06.07 17:41:04 +0530

**दिनांकः ०७.०६.२०२३** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाणः वडवणी** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वडवणी,**
**ता.वडवणी, जि.बीड.**

## **Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 07.06.2023 |
| Transcribed on | : | 07.06.2023 |
| Checked and signed on | : | 07.06.2023 |